परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
**दूरध्वनी क्र.**०२०-२५६२१३४६
**website :** www.unipune.ac.in

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
*(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)*
**Savitribai Phule Pune University**
*(formerly University of Pune )*

Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind, Pune - 411007.
**Phone No.** : 020-25621398
**E-mail :** bee@pun.unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा/एस ॲण्ड टी/ ६६३ दिनांक : २५ एप्रिल, २०२५

**अतिशय महत्त्वाचे**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा आणि दादरा-नगर हवेली)

**विषय : केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पासाठी (CAP) सर्व विषयांच्या सर्व शिक्षकांनी तात्काळ सहभागी होण्याबाबत......**

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मधील उन्हाळी २०२५ सत्राच्या सर्व परीक्षा आपल्या सहकार्याने अतिशय सुव्यवस्थित पार पडत आहेत. आपले सहकार्य अतिशय मौलिक असून विद्यापीठाच्या कामगिरीतील आपले मा. प्राचार्य/संचालक संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था म्हणून देत असलेले कृतीप्रवण योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

उन्हाळी सत्र २०२५ परीक्षांच्या आयोजनाबरोबरच जिल्हावार केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पावर (CAP) अभ्यासक्रमनिहाय मूल्यमापनाचे कार्य सुरु आहे. यात आपल्या महाविद्यालयातील विषयवार सर्व प्राध्यापकांना (ज्यांनी या सत्रात अध्यापनाचे कार्य केले आहे त्या सर्वांना) सहभागी होण्यास आपण आपल्या स्तरावर प्रोत्साहित करावे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४८ (४) नुसार विद्यापीठाच्या परीक्षा व विद्यार्थ्यांचे मूल्यमापन याबाबत परिनियमाद्वारे विहित केल्याप्रमाणे आवश्यक ते सहाय्य व सेवा देणे सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या प्रत्येक अध्यापकावर आणि अध्यापकेतर कर्मचाऱ्यावर बंधनकारक आहे, याची आपणास जाणीव आहेच. परंतु, हे कार्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे निकाल वेळेत जाहीर होण्यासाठी तितकेच महत्वाचे आहे हे सर्वांच्या निदर्शनास आणावे आणि सर्वजण केंद्रीय मूल्यमापनाच्या प्रक्रियेत वेळेत आणि पूर्ण कालावधीसाठी सहभागी होतील, याची खात्री आपल्या स्तरावरून विद्यापीठास कळवावी.

महोदय/महोदया, आपले सहकार्य मोलाचे असून विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापनातील आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेचा सहभाग तितकाच महत्वाचा असून यापुढील काळातील आपल्याकडून वेळोवेळी सहकार्य मिळेलच, अशी खात्री आहे.

हे पत्रक सर्वच संबंधित घटकांच्या निदर्शनास तात्काळ आणावे.

कळावे,

आपला,

(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ